डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला व संलग्नित अनुदानित महाविद्यालयांमधील कर्मचा-यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत.

## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

**वाचा:** १. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र. कृषिवि-३७२०/प्र.क्र.१४६/६-अे, दि. १०.११.२०२३.
२. समान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. एसआरव्हि-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा, ०८.०६.१९९५.
३. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र. अेजीए १९९५/सीआर १००/१८-अे, दि. २१.०९.१९९९.
४. डॉ. पं.दे.कृ.वि., आदेश क्र. बीईएम/१२९९, दि. ११.१०.१९९९.
५. वित्त विभाग, शासन निर्णय, क्र. वेतन १९९९/प्र.क्र.२/९९/सेवा ३, दि. २०.०७.२००१.
६. वित्त विभाग, शासन निर्णय, क्र. वेतन ११०९/प्र.क्र.४४/सेवा ३, दि. ०१.०४.२०१०.
७. वित्त विभाग, शासन निर्णय, क्र. वेतन ११०९/प्र.क्र.४१/सेवा ३, दि. ०५.०७.२०१०.
८. वित्त विभाग, शासन निर्णय, क्र. वेतन ११११/प्र.क्र.८/सेवा ३, दि. ०१.०७.२०११.
९. वित्त विभाग, शासन निर्णय, क्र. वेतन १०१४/प्र.क्र.२१/९९/सेवा ३, दि. ०६.०९.२०१४.

जा.क्र. बीईए/सु.आ.प्र.यो./शिक्षकेत्तर/०१/२०२३/2701 दि. ०१ जानेवारी, २०२४

**प्रस्तावना:-**

कृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठितता घालविण्यासाठी संबंधित पदधारकांना १२ वर्षाच्या नियमीत सेवेनंतर त्यांच्या पदोन्नती साखळीतील वरच्या पदावरील वेतनश्रेणी देण्याची कालबध्द पदोन्नती योजना कृषि व पदुम विभागाने शासन निर्णय, दिनांक २१ सप्टेंबर, १९९९ अन्वये लागु करण्यात आली होती. त्याअनुषंगाने विद्यापीठामध्ये विद्यापीठ आदेश क्र. बीईएम/१२९९, दि. ११ ऑक्टोंबर, १९९९ नुसार सदर योजना दि. ०१.१०.१९९४ पासुन लागू करण्यात आली.

२. वित्त विभाग शासन निर्णय दि. २० जुलै, २००१ अन्वये सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना (एक लाभाची) लागु करण्यात आली. वित्त विभाग शासन निर्णय दि. ०१ एप्रिल, २०१० अन्वये सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना (दोन लाभाची) शासन स्तरावर लागू करण्यात आली होती तथापी हया योजना कृषि विद्यापीठातील कर्मचा-यांना लागु करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला नव्हता. त्यामुळे सदर योजना लागू करण्याकरीता मा. उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठात याचीका दाखल झालेल्या होत्या. सदरहू याचीकांच्या निर्णयामध्ये सदरचा लाभ द्यावा असा निर्णय झाला आहे. सदरहू न्यायनिर्णयाच्या अनुषंगाने मा. उच्चन्यायालयात शासनाव्दारे पूनर्विचार याचीका दाखल करण्यात आल्या आहेत.

३. वित्त विभागाने मा. उच्चन्यायालयाच्या न्यायनिर्णयातील पुनर्विचार याचीकेच्या निर्णयाच्या अधिन राहुन सदर योजना कृषि विद्यापीठास लागु करण्यास सहमती देण्यात आली आहे. त्याप्रमाणे कृषि व पदूम विभाग शासन निर्णय दि. १० नोव्हेंबर, २०२३ नुसार कृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांना सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करतांना वित्त विभाग, शासन निर्णय, दि. ०१ एप्रिल, २०१०, दि. ०५ जुलै, २०१०

..२

व दि. ०६ सप्टेंबर, २०१४ मधील सर्व तरतूदी पुर्वलक्षी प्रभावाने मा. उच्चन्यायालयाच्या न्यायनिर्णयातील पुनर्विचार याचीकेच्या निर्णयाच्या अधिन राहुन लागू केल्या आहेत.

## आदेश

जा.क्र. बीईए/सु.आ.प्र.यो./शिक्षकेत्तर/०१/२०२३/2701 दि. ०१ जानेवारी, २०२४

महाराष्ट्र शासन, कृषि, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मस्त्यव्यवसाय विभाग, निर्णय क्र. कृषिवि-३७२०/प्र.क्र.१४६/६-अे, दि. १० नोव्हेंबर, २०२३ नुसार कृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांना वित्त विभाग, शासन निर्णय दि. ०१ एप्रिल, २०१० मधील तरतुदी नुसार सहाव्या वेतन आयोगातील संरचणेप्रमाणे पी.बी. -३ (रू. १५६००-३९१००) + ५४०० पर्यत ग्रेड वेतन घेणा-या कर्मचा-यांना तसेच वित्त विभाग, शासन निर्णय, दि. ०५ जुलै, २०१० व ०६ सप्टेंबर, २०१४ मधील तरतुदी नुसार, एकाकी पदावरील कर्मचा-यांना "सुधारीत सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजना" पुर्वलक्षी प्रभावाने **दि. ०१ ऑक्टोंबर, २००६** पासुन लागू करण्यात येत आहे. तथापी सदर्भ क्र. ८ मध्ये नमुद वित्त विभाग, शासन निर्णयानुसार दि. ०१.१०.२००६ ते दि.३१.०३.२०१० या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना या योजनेअंतर्गत दुसरा लाभ अनुज्ञेय नाही.

२. सदर **"सुधारीत सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजना"** ही मा. उच्चन्यायालयात न्यायनिर्णयाविरोधातील पुनर्विचार याचीकेच्या निर्णयाच्या अधिन राहुन लागू करण्यात येत आहे.

३. उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने विद्यापीठातील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांनी त्यांच्या कार्यालयात कार्यरत/सेवानिवृत्त/मयत कर्मचा-यांची माहिती संदर्भाकित नमुद शासन निर्णयांतील तरतुदींनुसार या आदेशासोबत जोडलेल्या प्रपत्रात पदनिहाय तयार करून, मुळ सेवापूस्तकावरून तपासुन, प्रमाणीत करून उपकुलसचिव (आस्था) या कार्यालयास **दि. १५ जानेवारी, २०२४** पर्यत सादर करावी.

उपरोक्त आदेश विद्यापीठाचे वित्त विभागाचे सहमतीने निर्गमीत करण्यात येत आहेत.

मा. कुलगुरूंचे मंजुरीने व आदेशानुसार.

कुलसचिव,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

प्रतिलिपीः-

१. अधिष्ठाता (सर्व)........................................
२. सहयोगी अधिष्ठाता (सर्व)........................................
३. संचालक संशोधन/विस्तार शिक्षण, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
४. विभाग प्रमुख (सर्व)........................................
५. वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, (सर्व)........................................
६. सहयोगी प्राध्यापक रा.कृ.सं.प्र. (सर्व)........................................
७. प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, (सर्व)........................................
८. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र, (सर्व)........................................
९. नियंत्रक/विद्यापीठ अभियंता/विद्यापीठ ग्रंथपाल, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.

१०. प्राचार्य, श्री. शिवाजी कृषि महाविद्यालय, अमरावती./आनंदनिकेतन कृषि महाविद्यालय, वरोरा./जनता कृषि महाविद्यालय, अमरावती/ग्रामीन शिक्षण संस्था, वर्धा/अमरावती.
११. अधिदान व लेखाधिकारी, अकोला/नागपुर
१२. मा. कुलगुरू/कुलसचिवांचे स्वीय सहायक यांना मा. कुलगुरू/कुलसचिव यांचे माहितीकरीता.
१३. प्रभारी अधिकारी, विद्यापीठ संगणक कक्ष, अकोला यांना विद्यापीठाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यास्तव
१४. ......................................................................................................................

कुलसचिव,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

Officer In Charge, Agricultural Research System Cell
★ Dr. P.D.K.V. Akola ★
Inward No. 517
Dt. 2/1/24

## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

**विद्यापीठ आदेश क्र. जा.क्र. बीईए/सु.आ.प्र.यो./शिक्षकेत्तर/०१/२०२३ दि. ०१.०१.२०२४ चे सहपत्र.**

शासन निर्णय दि. १० नोव्हेंबर, २०२३, दि. ०१ एप्रिल, २०१०, दि. ०५ जुलै, २०१० व दि. ०६ सप्टेंबर, २०१४ नुसार "सुधारीत सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजना" चा लाभ अनुज्ञेय असलेल्या कर्मचा-यांची माहिती.

**प्रपत्र**

| अ.क्र. | विवरण | कार्यालयीन शेरा | सहपत्र पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | **कर्मचा-याची माहिती** | | |
| | कर्मचा-याचे नांव | | |
| | जन्म दिनांक (सेवा पुस्तकाप्रमाणे) | | |
| | प्रथम नियुक्ती आदेश क्र. व दिनांक | | |
| | पदनाम व वेतनश्रेणी | | |
| | रूजू दिनांक | | |
| | नियुक्तीच प्रगर्व | | |
| | जात वैधता प्रमाणपत्र क्रमांक | | |
| | सेवापुस्तकातील वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र नोंद (प्रत जोडावी) | | |
| | परिविक्षा कालावधी पूर्ण झाल्याचा आदेश क्र. व दिनांक | | |
| | स्थायित्व प्रमाणपत्र आदेश क्र. व दिनांक | | |
| | सेवानिवृत्ती दिनांक | | |
| २ | शैक्षणीक अर्हता | | |
| | पदवि/पदव्युत्तर | | |
| | एच.एस.सी. | | |
| | एस.एस.सी. | | |
| | इतर अर्हता उदा. टंकलेखन/पदविका | | |
| ३ | प्रथम नियुक्तीनंतर पदोन्नती/कालबध्द पदोन्नतीचा प्रथम लाभ/नामनिर्देशनाने नियुक्ती झाली असल्यास | | |
| | विद्यापीठ आदेश क्र. व दिनांक (पदोन्नती/कालबध्द पदोन्नती/ नामनिर्देशन बाबत स्पष्ट नमुद करावे व मुळ सेवापुस्तकाचीप्रत जोडावी) | | |
| | पदनाम व वेतनश्रेणी | | |
| ४ | प्रथम नियुक्तीपासुन अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतन संरचनेचा लाभ मिळाल्या असल्यास | | |
| | दिनांक | | |
| | वेतन श्रेणी | | |
| ५ | उपरोक्त पदावर १२/२४ वर्षे नियमीत सेवा पुर्ण केल्याचा तपशिल | | |
| | सदर पदास पदोन्नती साखळी उपलब्ध आहे/एकाकी पद | | |
| | नियमीत आस्थापनेवर १२ वर्षे पुर्ण | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | झाल्याचा दिनांक | | | | | |
| | १२ वर्षे सेवा पुर्ण झाली असल्यास अनुज्ञेय वरिष्ठ वेतनश्रेणी | | | | | |
| | नियमीत आस्थापनेवर २४ वर्षे पुर्ण झाल्याचा दिनांक | | | | | |
| | २४ वर्षे सेवा पुर्ण झाली असल्यास अनुज्ञेय वरिष्ठ वेतनश्रेणी | | | | | |
| ६ | संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण/सुट | | | | | |
| ७ | मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण/सुट | | | | | |
| ८ | हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण/सुट | | | | | |
| ९ | यापुर्वी पदोन्नती नाकारली आहे काय? होय/नाही | | | | | |
| १० | प्रथम/व्दितीय लाभाची वेतनश्रेणी लागु होत असलेल्या दिनांकाच्या मागील ५ वर्षाचे गोपणीय अहवालाची प्रतवारी | प्रथम लाभ | | व्दितीय लाभ | | |
| | | सन | प्रतवारी | सन | प्रतवारी | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | सरासरी | | सरासरी | | |
| ११ | मत्ता व दायीत्व सादर केले आहे काय | होय/नाही/लागु नाही | | | | |
| १२ | विभागीय चौकशी/फौजदारी गुन्हा/न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित असल्यास त्याबाबत सद्यस्थिती | होय/नाही/लागु नाही | | | | |
| १३ | संशायात्मक सचोटी यादीमध्ये समावेश आहे किंवा नाही | होय/नाही/लागु नाही | | | | |

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त माहिती मी स्वतः संबंधीत कर्मचा-याच्या मुळ सेवापूस्तक व दस्तऐवजावरून तपासुन पाहीली असुन ती बरोबर आहे. याबाबत कोणतीही त्रुटी आढळुन आल्यास याची सर्वस्वी जवाबदारी माझी राहील.

**कार्यालय/विभाग प्रमुख**

टिपः- १. शासन निर्णय दि. १०.०९.२०२३ नुसार "सुधारीत सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजना" करीता फक्त पात्र कर्मचा-यांची माहिती सादर करण्यात यावी.

२. प्रत्येक कर्मचा-याची माहिती स्वतंत्र प्रपत्रामध्ये सादर करण्यात यावी.

३. विहित नमुण्यामध्ये कुठलाही बदल न करता आवश्यक तेथे रकाने वाढविण्यात यावे.

४. प्रस्तावासह आवश्यक दस्तऐवज/मुळ सेवापूस्तकातील नोंदीच्या छायांकित प्रति/शैक्षणीक कागदपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रति जोडण्यात याव्यात.

५. प्रस्तावास अनुक्रमांक देऊन त्यानुसार प्रपत्रामध्ये संबंधीत दस्ताऐवजांचा क्रमांक न चुकता नमुद करावा.

६. संबंधीत कार्यालय/विभाग प्रमुख यांनी उपरोक्त नमुद सुचनांच्या नुसार प्रस्ताव सादर होत असल्याबाबत खातरजमा करूनच प्रस्ताव सादर करावा, अपुर्ण प्रस्ताव सादर करू नये.